**जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कामासाठी अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील ७ पदे निर्माण करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक - इएसटी-२००८/प्र.क्र.४५/ई-८

मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२

दिनांक - १४ जुलै, २००८

**प्रस्तावना :-** सामाजिक न्याय विभागामार्फत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग व्यक्तिंना (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० नुसार छाननी समितीचे पुर्नगठन करण्यात आले असून विभागीय आयुक्त, अपर आयुक्त व अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. विभागीय आयुक्तांचे पद विभागीय प्रशासक म्हणून महत्वाचे असल्याने प्रत्येक विभागात जातीचे दाखले पडताळणीचे काम त्यांच्याकडील कार्यबाहुल्यामुळे विभागीय आयुक्तांकडे सोपविणे संयुक्तिक नाही. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षपदी ६ विभागीय आयुक्तांऐवजी रु. १४३००-४००-१८३०० या वेतनश्रेणीतील ६ अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील पदे व लातूर येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्ष पदासाठी अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील १ पद एकत्रित मिळून ७ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** सामाजिक न्याय विभागामार्फत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग व्यक्तींना (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन)अधिनियम, २००० नुसार पुर्नगठीत करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कामकाजाकरीता महसूल यंत्रणेच्या आस्थापनेवर अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील रु. १४३००-४००-१८३०० या वेतनश्रेणीतील ७ अस्थायी पदे निर्माण करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त ७ पदांपैकी प्रत्येक महसूल विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती करीता १ पद व लातूर येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती करीता १ स्वतंत्र पद अशी एकूण ७ पदे कार्यरत राहतील. ही पदे सामाजिक न्याय विभागाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत राहतील

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:-
आवक नं.: ८९
21 JUL 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-

२. यासाठी होणारा खर्च " प्रधान लेखाशीर्ष - २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इमाव यांचे कल्याण ०१, अनुसूचित जातींचे कल्याण, ००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) सामाजिक न्याय संचालनालय (मागासवर्ग शाखा २२२५००१२) मधून सामाजिक न्याय विभागाच्या सन २००८-२००९ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १७९/व्यय-९ व वित्तीय सुधारणा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३४१/०८/विसु-१ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु . मु . धाडवे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी,

१)सर्व विभागीय आयुक्त
२)सर्व जिल्हाधिकारी
३)प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा/अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) मुंबई / नागपूर
४)अपर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
५)सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
६)कक्ष अधिकारी, व्यय-९/वित्तीय सुधारणा-१/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
७)ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
८)ई-८, कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२